http://www.epitomejournals.com, Vol. 3, Issue 7, September 2017, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# देऊळगावराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांचे आर्थिक स्थितीचे अध्ययन



Mr. Narendra Shegokar
Shri Vyankatesh Arts, Commerce & Science
College, Deulgaon Raja, Dist- Buldana 443201

## ABSTRACT

**प्रस्तावना :** मानवी जीवन जगत असतांना समाजातील प्रत्येक व्यक्तीला विविध वस्तू आणि सेवांची गरज असते. व्यक्तीला आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणा–या वस्तू आणि सेवा त्या ज्या ठिकाणी उपलब्ध असतात त्या ठिकाणाहून त्या खरेदी कराव्या लागतात. उत्पादक समाजाला आवश्यक असणा–या विश्निन्न प्रकारच्या वस्तू आणि सेवांचे उत्पादन करतो. उत्पादीत वस्तू आणि सेवा गरजू व्यक्तींपर्यंत पोहचविण्यासाठी तो अश्किर्त्यांची नियुक्ती करतो. या अश्किर्त्यांच्या मार्फत ज्या बाजारपेठेत उत्पादीत वस्तू आणि सेवांची गरज आहे त्या ठिकाणी त्या पोहचविल्या जातात. उत्पादक प्रत्यक्षपणे ग्राहकांपर्यंत वस्तू व सेवा पोहचविण्यासाठी असमर्थ ठरतो त्यामुळे तो काही अधिकृत अश्किर्त्यांची (विक्रेता) यांची नियुक्ती करतो. उत्पादक (प्रमुख) आणि अश्किर्ता यांच्यामध्ये जे कायदेशिर संबंध निर्माण होतात त्या संबंधांना अश्किर्तृत्व असे म्हणतात. या करारामध्ये दोन पक्ष निर्माण होतात. 1) प्रमुख आणि 2) अश्किर्ता प्रमुखाच्या वतीने काम करणा–या व्यक्तीला अश्किर्ता म्हणतात. हा अश्किर्ता उत्पादकांच्या वस्तू व सेवा ग्राहकापर्यंत पोहचविण्याचा एक महत्वपूर्ण दुवा म्हणून काम करतो.

## KEYWORDS

देऊळगावराजा शहर, एजन्सीधारक, आर्थिक स्थिती, वस्तू आणि सेवांची गरज

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-In-Chief ©EIJMR, All Rights Reserved.

# RESEARCH PAPER

**प्रकल्पाची निवड :**

देऊळगावराजा शहरात जे एजन्सीधारक आहेत त्यांच्याकडे कोणत्या वस्तू आणि सेवांची एजन्सी आहे त्यासाठी त्यांना कोणकोणत्या अटींची पूर्तता करावी लागते. वस्तु आणि सेवा कशा पध्दतीने उपलब्ध होतात, त्यांचे वितरण कसे होते, एजन्सीचे कार्य केल्यामुळे त्यांना कोणत्या अडचणी येतात, त्या ते कशा पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न करतात या कार्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीवर कशा स्वरुपाचा परिणाम होतो, एजन्सीच्या या कार्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी कशा प्रकारे उपलब्ध होतात, या कारणांचा अभ्यास करण्यासाठी वाणिज्य शाखेतील शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांच्या सहकार्याने देऊळगांवराजा शहरातील एजन्सीधाराकांचे आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी या प्रकल्पाची निवड केली आहे.

देऊळगावराजा तालुक्यात 64 गावांचा समावेश असून देऊळगावराजा तालुक्याची लोकसंख्या या तालुक्यातील व्यक्तींना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या विश्न्नि वस्तु आणि सेवांची गरज असते त्या वस्तू आणि सेवा किरकोळ व्यापा—यांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी हे एजन्सीधारक महत्वपूर्ण शुमिका बजावित असतात. एजन्सीधारक समाजाला आवश्यक असणा—या वस्तू आणि सेवा योग्य वेळी योग्य किंमतीला योग्य ठिकाणी उपलब्ध करुन देत असल्यामुळे ग्राहकांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असणा—या वस्तू आणि सेवा योग्य वेळी योग्य किंमतीला योग्य ठिकाणी उपलब्ध होतात.

**प्रकल्पाची उद्दीष्टे :**

या प्रकल्पाची उद्दीष्टे पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

1) देऊळगावराजा शहरातील एजन्सींचा अभ्यास करणे.

2) मुलाखत अनुसूचीव्दारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर एजन्सीधारकांसमोर निर्माण होणा—या समस्यांचे अध्ययन करणे.

3) देऊळगावराजा शहरातील एजन्सीधारकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

4) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीवर होणा—या परिणामांचे अध्ययन करणे.

**प्रकल्पाची व्याप्ती आणि मर्यादा :**

देऊळगांवराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांचे आर्थिक स्थितीचे अध्ययन या प्रकल्पाचे कार्य मर्यादीत कालावधीत यशस्वीरित्या पूर्ण करता यावे यासाठी प्रकल्पाची व्याप्ती ही देऊळगांवराजा शहरापुरती मर्यादीत ठेवण्यात आली. वेळ, श्रम आणि पैसा या बाबी विचारात घेऊन प्रकल्पाचा कालावधी 1 वर्ष एवढा निश्चित करण्यात आला.

**प्रकल्पाची गृहीतके :**

देऊळगांव राजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांचे आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी पुढील गृहीतके निश्चित करण्यात आली.

1) देऊळगावराजा शहरातील एजन्सीमुळे स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीवर अल्पसा

परिणाम झाला.

2) एजन्सीधारकांच्या आर्थिक स्थितीवर चांगला परिणाम झाला.

3) एजन्सी व्यवयासामुळे एजन्सीधारक समाधानी आहेत.

**संशोधन पध्दती :**

देऊळगांवराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांचे आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची वेबसाईट देऊळगावराजा तहसिल कार्यालय, देऊळगावराजा नगर परिषद कार्यालय, यांच्याकडून आवश्यक ती माहिती दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून उपलब्ध करुन घेण्यात आली. देऊळगावराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांसमोर असणा–या समस्या व त्यांची आर्थिक स्थिती याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी मुलाखत अनुसूची या प्राथमिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**नमुना निवड पध्दती :**

या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी प्राथमिक माहिती प्राथमिक तथ्य संकलनाच्या माध्यमातून गोळा करण्यासाठी साध्या नमुना निवड पध्दतीची निवड करण्यात आली आहे. प्रकल्पाचे कार्य निश्चित कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या हेतूने 50 एजन्सीधारकांच्या मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात आल्या.

देऊळगावराजा शहरातील तसेच देऊळगावराजा तालुक्यातील 64 गावांमध्ये राहणा–या लोकांना ज्या विविध वस्तू आणि सेवांची गरज असते त्या त्यांच्यापर्यंत योग्य वेळी योग्य ठिकाणी योग्य किंमतीला पोहचविणे हे उत्पादन घेणा–या उत्पादकांचे एक महत्वपूर्ण उद्दीष्ट असते. जेणेकरुन आपला माल लवकरात लवकर गरजू ग्राहकांपर्यंत पोहचवून अधिकाधिक बाजारपेठ काबीज करुन अधिकाधिक लाभ कसा प्राप्त करता येईल हा हेतू साध्य करता येतो. त्यासाठी उत्पादक त्या गावामध्ये किती लोकसंख्या आहे, ग्राहक वर्गाचे उत्पन्न त्याला आवश्यक असणा–या वस्तू आणि सेवा, स्त्री ग्राहक, पुरुष ग्राहक, लहान मुले, युवा वर्ग किती आहे या बाबत बाजारपेठ विषयक संशोधन करुन हा माल विकण्यासाठी कोणाकडे एजन्सी द्यावी, ज्यांना एजन्सी द्यावयाची आहे त्याचा जनसंपर्क कशा स्वरुपाचा आहे, त्याची बाजारातील पत आणि प्रतिष्ठा या आगोदर त्याच्याकडे कोणत्या कंपनीची एजन्सी आहे या संबंधीत बाबींचा अभ्यास केला जातो. या अभ्यासाव्दारे संबंधीत संस्थेची एजन्सी देण्यासाठी निवड केली जाते. देऊळगावराजा शहरात असणा–या एजन्सी पुढील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1) मे. के. डी. जैन | कोलगेट, एव्हरीडे |
| 2) मे. बी.सी.मल्लावत | माजी ऑईल, हेल्थफिट ऑईल, टाटा साल्ट |
| 3) अनुप एजन्सीज | आर.एस.पी.एल., पिडीलाइट, सेलो पेन, रायलक्स टॉर्च |
| 4) राजेश प्रोव्हीजन | रामबंधू मसाले |
| 5) न्यू श्री प्रोव्हीजन | विप्रो सोप, अँकर, टू डेज पेन |
| 6) न्यू उल्हास जनरल स्टोअर्स | क्राऊन बॅटरी |
| 7) जय माता दी एजन्सी | डाबर, नेस्ले, गोदरेज, सारा ली |
| 8) वर्षा मेडिकल | आर.सी.आय. जे ॲण्ड जे, इमामी, बॅनलॅब |
| 9) मे.बी.के.सराफ | गाय छाप जर्दा, सुरुची मसाले, प्रविण पावडर |

| | |
|---|---|
| 10) दिपक पान मटेरियल्स | सायकल अगरबत्ती, वंडर बिस्कीट, लेहर चिप्स |
| 11) संकेत एजन्सी | अंकुर साल्ट, विनायक ऑईल |
| 12) व्यंकटेश किराणा | सुर्य छाप जर्दा |
| 13) किशोर इलेक्टॅनिक्स | फिलीप्स लायटींग |
| 14) वर्षा एंटरप्रायजेस | इलेक्टॅनिक्स |
| 15) गुरुप्रसाद टॅन्डर्स | हार्डवेअर |
| 16) दुर्गा प्लायवूड | प्लायवूड, सनमायका |
| 17) धुळे ऑप्टीकल्स (आयमित्रा) | ॲस्सीलोर चष्मे व गॉगल |

देऊळगावराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांचे आर्थिक स्थितीचे अध्ययन या शोध प्रकल्पाचे कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती मुलाखत अनुसूचीव्दारे विद्यार्थ्यांच्या मदतीने गोळा करण्यात आली. गोळा केलेल्या माहितीच्या विश्लेषणावरुन असे निदर्शनास आले की, एजन्सी सुरु करण्यासाठी जागा शंडवल, मालाची अधिकाधिक विक्री, ग्राहकांची संख्या, वाहतुकीची साधने, वस्तुंच्या विक्रीवर मिळणारे कमिशन इ. महत्वपूर्ण अटींची पूर्तता करावी लागते.

देऊळगावराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांना एजन्सी घेण्यामागील कारणे विचारले असता प्राप्त माहितीच्या आधारे असे लक्षात आले की, आर्थिक उत्पन्न प्राप्त करणे, उत्पन्नाचे पुरक साधन, स्वयंरोजगाराची संधी, देऊळगांवराजा शहरातील ग्राहकांना दर्जेदार उत्पादकांच्या वस्तू योग्य वेळी, योग्य किंमतीला, योग्य ठिकाणी उपलब्ध करुन देणे, स्थानिक बाजारपेठेचे कार्यक्षेत्र अधिकाधिक व्यापणे, व्यवसाय वाढविण्यासाठी प्रत्येक रिलेटरपर्यंत माल वेळेत पोहचविणे, शहरातील डिमांड व व्यवसायाची वृध्दी, ग्राहकांना सेवा देणे या कारणाने एजन्सी घेतली आहे.

एजन्सीधारकांच्या मुलाखतीव्दारे गोळा करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे असे लक्षात आले की, कोणत्या एजन्सीधारकांकडे किती एजन्सी आहे, त्या कोणकोणत्या कंपनीच्या आहेत, त्या एजन्सी प्राप्त करण्यासाठी त्यांना कोणत्या बाबींची पूर्तता करावी लागली याबाबत माहिती गोळा करण्यात आली. एजन्सीधारकांकडे असणा—या एजन्सीची संख्या किती आहे या बाबतची माहिती पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट केली आहे.

**एजन्सीधारकांकडे असणा—या एकूण एजन्सींची संख्या दर्शविणारा तक्ता.**

| **एजन्सीची संख्या** | **एजन्सीधारकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 1 ते 3 | 22 | 44ज्ञ् |
| 3 ते 6 | 12 | 24ज्ञ् |
| 6 पेक्षा अधिक | 16 | 32ज्ञ् |
| **एकूण** | **50** | **100ज्ञ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, 1 ते 3 एजन्सी घेणा—या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात अधिक म्हणजे 22 एवढी आहे. तर 3 ते 6 च्या दरम्यान एजन्सी घेणा—या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 12 एवढी आहे.

एजन्सीधारकांना आपल्या एजन्सीशी संबंधीत असणारी विविध कामे पार पाडण्यासाठी शंडवलाची गरज असते. देऊळगांवराजा शहरातील एजन्सीधाराकांनी कोणत्या मार्गाव्दारे शंडवल उपलब्ध केले आहे या संबंधीची माहिती मुलाखत अनुसूचीव्दारे गोळा करण्यात आली. या प्राप्त माहितीच्या आधारावर एजन्सीधारकांनी गुंतविलेल्या शंडवलाबाबत माहिती दाखविणारा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**एजन्सीसाठी आवश्यक असणा–या शंडवलाचे स्त्रोत दाखविणारा तक्ता**

| **शंडवलाचे स्त्रोत** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| स्वमालकीचे | 10 | 20झ् |
| उधार / कर्जाऊ | 25 | 50झ् |
| दोन्ही | 15 | 30झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, उधार किंवा कर्जाऊ शंडवलाच्या स्त्रोताव्दारे शंडवल उशरणी करणा–या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात जास्त म्हणजे 25 आहे. तर स्वमालकीच्या स्त्रोताव्दारे शंडवल उशरणी करणा–या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 10 आहे.

एजन्सीसाठी जागेची आवश्यकता असते. एजन्सीधारकांच्या मुलाखती घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे एजन्सीधारकाकडे एजन्सीसाठीची जागा कशा स्वरुपाची आहे याबाबत माहिती दाखविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

**एजन्सीची जागा कशा स्वरुपाची आहे हे दाखविणारा तक्ता**

| **जागेचे स्वरुप** | **एजन्सीधारकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| स्वमालकीची | 23 | 46झ् |
| करारतत्वावर | 27 | 54झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, एजन्सीची जागा करारतत्वावर घेणा–या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात अधिक म्हणजे 27 एवढी असून टक्केवारी 54 एवढी आहे. तर स्वमालकीची जागा असणा–या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 23 असून टक्केवारी 46 एवढी आहे.

एजन्सीसाठी आवश्यक असणा–या मालाची खरेदी आपण कोठून करता या संबंधीची माहिती एजन्सीधारकांना विचारली असता त्यांनी एजन्सीसाठी आवश्यक असणारा माल जालना, अकोला, औरंगाबाद, मुंबई, पुणे, सुरत, अमरावती, बुलडाणा, जळगांव, चेन्नई, तेलंगना, बेंगलूरु, बारामती इत्यादी महत्वपूर्ण ठिकाणांहून खरेदी केला जातो असे सांगितले.

एजन्सीसाठी आवश्यक असणा–या वस्तुंची खरेदी किती कालावधीमध्ये केली जाते असा प्रश्नएजन्सीधारकांना विचारला असता त्यांनी असे सांगितले की, गरजेनुसार माल योग्य वेळी खरेदी केला जातो. काही एजन्सीधरकांच्या मते आवश्यक असणा–या मालाची खरेदी दर 8 दिवसाला, काही एजन्सीधारकांच्या मते 10 ते 15 दिवसांनंतर, काही एजन्सीधारकांच्या मते आवश्यक असणा–या मालाची खरेदी हंगामामध्ये केली जाते

असे सांगितले.

एजन्सीसाठी आवश्यक असणा—या मालाची खरेदी करण्यासाठी आपण कोणत्या पध्दतीचा वापर करता या संबंधीची माहिती मुलाखत अनुसूचीव्दारे प्राप्त करण्यात आली. या प्राप्त माहितीवरुन असे लक्षात आले की, ऑफलाईनव्दारे विविध वस्तू व सेवांची खरेदी करणा—या एजन्सीधारकांची संख्या ही 29 एवढी असून ऑनलाईनव्दारे खरेदी करणा—या एजन्सीधाराकांची संख्या 11 एवढी आहे. दोन्हीव्दारे खरेदीकरणा—या एजन्सीधारकांची संख्या 10 एवढी आहे.

एजन्सीचा माल कोणकोणत्या ठिकाणी आपण वितरीत करता या संदर्शची माहिती  एजन्सीधारकांना मुलाखत अनुसूचीव्दारे विचारली असता त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे असे निदर्शनास आले की, एजन्सीचा माल देऊळगावराजा व देऊळगावराजा तालुक्यामधील 64 गावातील विविध किरकोळ दुकानदारांना त्यांच्या गरजेनुसार वितरीत केला जातो.

उत्पादकांकडून खरेदी केलेला माल गरजू, किरकोळ विक्रेत्यापर्यंत पोहचविण्यासाठी आपणाकडे असणारे वाहतुकीचे साधन कशा स्वरुपाचे आहे ही माहिती विचारली असता त्या माहितीच्या आधारे प्राप्त इ ाालेली माहिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**एजन्सीधारकांकडे वाहतुकीचे साधन कशा स्वरुपाचे आहे ही माहिती दर्शविणारा तक्ता**

| वाहतुकीचे साधनाचे स्वरुप | एजन्सीधारकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| स्वमालकीची | 16 | 32झ् |
| किरायाचे | 34 | 68झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, किरायाने वाहतुकीचे साधन वापरणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात अधिक म्हणजे 34 एवढी असून टक्केवारी 68 एवढी आहे. तर स्वमालकीचे वाहतुकीचे साधन  वापरणा—या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 16 असून टक्केवारी 32 एवढी आहे.

एजन्सीमध्ये असणारा माल विकण्यासाठी आपण कोणती वैयक्तिक स्वरुपाची जाहीरात देता का? असा प्रश्न मुलाखतीदरम्यान एजन्सीधारकांना विचारला असता मुलाखती अंतर्गत प्राप्त इ ाालेल्या माहितीवरुन असे लक्षात आले की, 41 एजन्सीधारकांनी वैयक्तिक स्वरुपाची जाहीरात करण्याची गरज नाही असे सांगितले तर 9 एजन्सीधारकांनी वैयक्तिक स्वरुपाची जाहीरात करण्याची गरज आहे असे सांगितले.

एजन्सीशी संबंधीत असणारी विश्न्नि कामे पार पाडण्यासाठी कायम व हंगामी स्वरुपाच्या कर्मचा—यांची गरज असते. आपल्या एजन्सीमध्ये कायम आणि हंगामी स्वरुपाचे काम करणा—या कर्मचा—यांची संख्या किती आहे ? असा प्रश्न मुलाखतीदरम्यान एजन्सीधारकांना विचारला असता प्राप्त माहितीवरून असे लक्षात आले की, कायम व हंगामी काम करणा—या कर्मचा—यांची संख्या ही एजन्सीच्या उलाढालीवर अवलंबून असते. एजन्सीमध्ये कायम व हंगामी स्वरुपाचे काम करणा—या कर्मचा—यांची संख्या पुढील तक्त्यात दाखविलेली आहे.

**एजन्सीमध्ये कायम व हंगामी स्वरुपाचे काम करणा—या कर्मचा—यांची संख्या दाखविणारा तक्ता**

| कामाचे स्वरुप | कर्मचा—यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|

 Impact Factor = 3.656 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-In-Chief ©EIJMR, All Rights Reserved.

| | | |
|---|---|---|
| कायम | 11 | 22झ् |
| हंगामी | 39 | 78झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, कायम स्वरुपाचे काम करणा—या कर्मचा—यांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 11 एवढी आहे, तर हंगामी स्वरुपाचे काम करणा—या कर्मचा—यांची संख्या ही सर्वात जास्त म्हणजे 39 एवढी आहे.

एजन्सीधारकांना तुम्हाला तुमच्या कामाचा मोबदला कोणत्या स्वरुपात मिळतो असे विचारले असता जी माहिती प्राप्त इ ााली ती माहिती पुढील तक्त्यात दाखविलेली आहे.

**एजन्सीच्या कामाचा मोबदला कोणत्या स्वरुपात मिळतो हे दाखविणारा तक्ता**

| **कामाच्या मोबदल्याचे स्वरुप** | **एजन्सीधारकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| कमिशन | 38 | 76झ् |
| निश्चित रक्कम | 12 | 24झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, कमिशनच्या स्वरुपात मोबदला मिळणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात अधिक म्हणजे 38 एवढी असून टक्केवारी 76 एवढी आहे. तर निश्चित रकमेच्या स्वरुपात मोबदला मिळणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात कमी म्हणजे 12 एवढी असून टक्केवारी 24 एवढी आहे.

**एजन्सीच्या व्यवसायामुळे आपल्या आर्थिक परिस्थितीमध्ये कोणता बदल इ ााला याबाबतची माहिती दर्शविणारा तक्ता**

| **आर्थिक स्थितीतील बदल** | **एजन्सीधारकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| खालावली | 03 | 6झ् |
| सुधारली | 39 | 78झ् |
| बदल नाही | 08 | 16झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, एजन्सीच्या व्यवसायामुळे आर्थिक स्थितीत सुधारणा इ ाली असे म्हणणा—या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात अधिक म्हणजे 39 एवढी आहे. तर आर्थिक स्थितीत कोणताही बदल इ ााला नाही असे म्हणणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात कमी म्हणजे 8 एवढी असून आर्थिक स्थिती खालावली असे म्हणणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात कमी म्हणजे 3 एवढी आहे.

व्यवहारपूर्ततेसाठी आपण कोणत्या माध्यमाचा वापर करता असा प्रश्न विचारला असता 22 एजन्सीधारक रोख माध्यमाचा तर 19 एजन्सीधाराक ऊउए आणि 9 एजन्सीधारक — इऊ चा वापर करतात.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 नोव्हेंबर 2016 च्या मध्यरात्रीपासून 500 व 1000 च्या जुन्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेतला. यानिर्णयाचा वस्तूविक्रीवर काय परिणाम इ ााला असा प्रश्न विचारला असता प्राप्त माहितीत पुढील तक्यात दाखविलेली आहे.

**नोटबंदीचा वस्तु विक्रीवर इ ाालेला परिणाम दाखविणारा तक्ता**

| वस्तुविक्रीवरील परिणाम | एजन्सीधारकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 41 | 82झ् |
| नाही | 9 | 18झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, नोटबंदीमुळे एजन्सीच्या व्यवसायावर परिणाम इ ााला असे सांगणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात अधिक म्हणजे 41 एवढी असून टक्केवारी 82 एवढी आहे. तर परिणाम इ ााला नाही असे सांगणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात कमी म्हणजे 9 एवढी असून टक्केवारी 18 एवढी आहे.

एजन्सीमधील माल व्यापा—यांना विकल्यानंतर ग्राहकांच्या समाधानासाठी कोणती यंत्रणा आहे या बाबत विचारणा केली असता मुलाखत अनुसूचीव्दारे प्राप्त इ ाालेली माहिती असे सांगते की, एजन्सीधारक ग्राहकांच्या समाधानासाठी वैयक्तिक समस्येची सोडवणूक करणारी यंत्रणा उपयोगात आणली जाते.

सणासुदीच्या दिवसात किंवा हंगामात ग्राहकांना वस्तुंची विक्री करण्यासाठी कोणती सुविधा उपलब्ध असते याबाबत प्राप्त केलेली माहिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**सणासुदीच्या दिवसात किंवा हंगामात दिली जाणारी सुविधा दर्शविणारा तक्ता**

| सणासुदीत / हंगामात दिली जाणारी सुविधा | एजन्सीधारकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रोख सुट | 29 | 58झ् |
| एक्सेसरीज (फ्री) | 12 | 24झ् |
| एक्सचेंज ऑफर | 5 | 10झ् |
| बक्षिस | 4 | 8झ् |
| **एकूण** | **50** | **100झ्** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, सणासूदीत किंवा हंगामात ग्राहकांना वस्तुंची विक्री करण्यासाठी रोख सुट देणा—या एजन्सीधारकांची संख्या सर्वात अधिक म्हणजे 29 एवढी असून बक्षिस देणा—या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 4 एवढी आहे.

एजन्सीच्या माध्यमातून वस्तुची विक्री करतांना आवश्यक असणारा वित्त पुरवठा कशा पध्दतीने केला जातो असा प्रश्न गाड्यांची विक्री करणा—या एजन्सीधारकांना विचारला असता त्यांनी ग्राहकांना ताबडतोब सहज व कमी व्याजदरावर वित्तीय पुरवठा व्हावा यासाठी एजन्सीधारकांनी वित्तीय संस्थांसोबत करार केलेला असतो. या वित्तीय संस्था ग्राहकांना त्यांच्या आर्थिक उत्पन्नानुसार कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देतात.

एजन्सीमुळे ग्राहकांना आवश्यक असणा—या वस्तू स्थानिक पातळीवर उपलब्ध इ ााल्यामुळे ग्राहक समाधानी होतात काय या संबंधीची माहिती मुलाखत अनुसूचीव्दारे प्राप्त करण्यात आली. या प्राप्त माहितीवरुन असे लक्षात आले की, होय म्हणणा—या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात अधिक म्हणजे 45 एवढी असून नाही म्हणणा—या एजन्सीधाराकांची संख्या 5 एवढी आहे.

ऑनलाईन खरेदीमुळे आपल्या व्यवसायावर काही परिणाम झाला का या संबंधीची माहिती मुलाखत अनुसूचीव्दारे प्राप्त करण्यात आली. या प्राप्त माहितीवरुन असे लक्षात आले की, ऑनलाईन खरेदीमुळे व्यवसायावर परिणाम झाला असे सांगणा–या एजन्सीधारकांची संख्या ही 18 एवढी असून ऑनलाईन खरेदीमुळे व्यवसायावर परिणाम झाला नाही असे सांगणा–या एजन्सीधारकांची संख्या ही 32 एवढी आहे.

व्यवसाय वृध्दिंगत करण्यासाठी आपल्या भविष्यकालीन योजना कोणत्या आहेत या संबंधीची माहिती मुलाखत अनुसूचीव्दारे प्राप्त करण्यात आली. या प्राप्त माहितीवरुन असे लक्षात आले की, एजन्सीधारक भविष्यकाळात आपला व्यवसाय वृध्दिंगत करण्यासाठी वैयक्तिक संपर्क, विक्रेयोत्तर सेवा, वित्तीय सुविधा, गरजेनुसार वस्तुंची उपलब्धता इ. योजना अंमलात आणण्याचा मानस आहे असे सांगितले.

देऊळगांवराजा शहरातील व्यावसायिक एजन्सीधारकांना एजन्सीच्या या व्यवसायामध्ये आपण समाधानी आहात काय या बाबत विचारणा केली असता प्राप्त झालेली माहिती पुढील तक्त्यात दाखविलेली आहे.

**व्यवसायाबाबत समाधानी आहात काय हे दाखविणारा तक्ता**

| समाधानाबाबतचे मत | एजन्सीधारकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 41 | 82% |
| नाही | 9 | 18% |
| **एकूण** | **50** | **100%** |

वरील तक्तयावरुन असे लक्षात येते की, एजन्सीच्या व्यवसायामध्ये समाधान असलेल्या एजन्सीधारकांची संख्या सर्वात अधिक म्हणजे 41 एवढी असून समाधानी नसणा–या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वात कमी म्हणजे 9 एवढी आहे.

**समस्या :**

1) अधिकाधिक एजन्सी असणा–या एजन्सीधारकांची संख्या ही कमी आहे.

2) उधारी / कर्जाऊ भांडवल घेणा–या एजन्सीधारकांची संख्या ही अधिक आहे.

3) करारतत्वावर जागा घेणा–या एजन्सीधारकांची संख्या ही स्वमालकीची जागा असणा–या एजन्सीधारकांपेक्षा अधिक आहे.

4) रोखीने व्यवहार करणा–या एजन्सीधारकांची संख्या ही जास्त आहे.

5) ऑफ लाईन पध्दतीने माल खरेदी करणा–या एजन्सीधारकांची ऑनलाईन पध्दतीने खरेदी करणा–या एजन्सीधारकांपेक्षा जास्त आहे.

6) हंगामी स्वरुपाच्या कर्मचा–यांची संख्या ही कायम स्वरुपी कर्मचा–यांच्या संख्येपेक्षा अधिक आहे.

7) नोटबंदीचा एजन्सीच्या व्यवसायावर परिणाम झाला असे सांगणा–या एजन्सीधारकांची संख्या ही सर्वाधिक आहे.

8) एक्सचेंज ऑफर आणि बक्षिस या सारख्या सुविधा उपलब्ध करुन देणा–या एजन्सीधारकांची संख्या ही नगण्य आहे.

9) वित्तीय संस्थांसोबत करार करुन वित्ताची सोय उपलब्ध करुन देणा–या एजन्सीधारकांची संख्या अल्प

आहे.

**उपाय योजना :**

1) 6 पेक्षा अधिक एजन्सी असणा—या एजन्सीधारकांच्या संख्येत वाढ होण्यासाठी उत्पादकांनी देऊळगावराजा शहराची बाजारपेठ अधिकाधिक काबीज करण्यासाठी शविष्यकालीन योजना आखल्यास निश्चितच अधिकाधिक एजन्सी घेणा—या एजन्सीधारकांच्या संख्येत वाढ होण्यास मदत होईल.

2) स्वमालकीचे शंडवल हे उधारी / कर्जाऊ घेतलेल्या शंडवलापेक्षा अधिक असल्यास शंडवलाची समस्या निर्माण होणार नाही. व्याजाच्या स्वरुपात अधिक खर्च होणार नाही त्यासोबतच एजन्सीधारकांना एजन्सीशी संबंधीत कार्ये यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शंडवलाची कमतरता जाणवणार नाही.

3) स्वमालकीच्या जागेसाठी एजन्सीधारकांनी आपल्या आर्थिक उत्पन्नात वाढ करुन प्रयत्न केल्यास करार तत्वावर द्याव्या लागणारा किराया खर्च कमी होण्यास मदत होईल.

4) ऑनलाईन, डिजिटल पेमेंट यासारख्या सोयीस्कर मार्गाचा एजन्सीधारकांनी अवलंब केल्यास एजन्सी व्यवसायावर त्याचा अनुकूल स्वरुपाचा परिणाम होईल.

5) ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन एजन्सीधारकांनी उत्पादकांकडून मालाची खरेदी केल्यास ग्राहकांना वस्तू आणि सेवा या कमी किंमतीत उपलब्ध होतील. त्यामुळे एजन्सीधारकांचा त्यासोबत ग्राहकांचा देखील फायदा होईल.

6) देऊळगावराजा शहरातील एजन्सीची संख्या वाढत गेल्यास कायम स्वरुपी कर्मचा—यांच्या संख्येत वाढ होण्यास मदत होईल.

7) एक्सचेंज ऑफर आणि बक्षिस या सारख्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास एजन्सीचा व्यवसाय वाढण्यास मदत होऊन एजन्सीधारकांच्या उत्पन्नात वाढ होईल.

9) महाग किंमतीच्या वस्तु ग्रामीण शगातील ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी देऊळगावराजा शहरातील एजन्सीधारकांनी वित्तीय संस्थांसोबत करार करुन वित्ताची सोय उपलब्ध करुन दिल्यास विक्रीत नगांच्या संख्येत वाढ होण्यास मदत होईल.